




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : ०९४ • पुणे • मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313


# महापालिकांचा आरंभ

## मुंबईसह २९ महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर, १५ जानेवारीला मतदान, १६ जानेवारीला निकाल!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्य निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत मोठी घोषणा केली आहे. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकींची घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे. मुंबई, ठाण्यासह राज्यातील २९ महानगर पालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. १५ जानेवारीला सर्व महापालिकांसांठी मतदान पार पडणार आहे, तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

"आजच्या पत्रकार परिषदेत मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्यासाठी करण्यात आलेली कार्यवाही याबाबतची माहिती देण्यासाठी घेण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील २९ महापालिका



निवडणुकीच्या संदर्भात ही पत्रकार परिषद असून २९ पैकी २७ महापालिकेची मुदत संपलेली आहे. तर ५ महापालिकेची मुदत २०20 मध्येच संपलेली होती. तसेच १८ महापालिकांची मुंबईसह २०२२ मध्ये मुदत संपलेली होती. तसेच ४ महापालिकांची मुदत ही २०२३ मध्ये संपलेली आहे", अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

### निवडणूक कार्यक्रम?

- नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी – २३ ते ३० डिसेंबर
- नामनिर्देशन पत्र छाननी – ३१ डिसेंबर २०२५
- उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत – २ जानेवारी २०२६
- निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी – ३ जानेवारी २०२६
- मतदान १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडेल.
- निवडणूक निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी लागेल.

## ठळक बातम्या

### तेजवानीचा जामिनासाठी अर्ज

पुणे (आरंभ पर्व) : मुंढवा येथील शासकीय जमीन गैरव्यवहार प्रकरणात शीतल तेजवानीचा गुन्ह्यातील सहभाग, तसेच डीडमध्ये नमूद केलेले ३०० कोटी रुपये कसे घेतले? व इतर कोण-कोण सहभागी आहे, या संबंधात सखोल विचारपूस करूनही माहिती देत नाही. आरोपीविरोधात पुरावा गोळा करून न्यायालयात दोषारोपपत्र पाठविणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलिसांनी आरोपी तेजवानी हिला न्यायालयीन कोठडी देण्याची मागणी केली. त्यानुसार शीतल तेजवानी हिला सोमवारी न्यायालयीन कोठडी देण्यात आली असून, तिची रवानगी कारागृहात करण्यात आली आहे. दरम्यान, तेजवानीने जामीन मिळण्यासाठी अर्ज केला असून, त्यावर १९ डिसेंबरला तपास अधिकारी आपले म्हणणे सादर करणार आहेत.

### निर्जनस्थळी नेऊन जिवंत जाळलं!

लातूर (आरंभ पर्व) : लातूर जिल्ह्यातील औसा शहरात वानवाडा रोड परिसरात स्कोडा कारमध्ये मोठी आग लागल्याची माहिती मिळताच एकच खळबळ उडाली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलीस आणि अग्निशमन दलाच्या पथकाने आग आटोक्यात आणली. मात्र कारची झडती घेतल्यावर पोलिसांना धक्का बसला. या कारमध्ये पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. सुरुवातीला ही घटना अपघात किंवा आत्महत्या वाटली, पण औसा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत या घटनेचा छडा लावत, हा पूर्वनियोजित हत्या आणि विम्याचे पैसे लाटण्याचा कट असल्याचे उघड केले.

### कात्रज-कोंढवा रस्ता मृत्यूचा सापळा

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहरातील बहुचर्चित कात्रज-कोंढवा रस्त्याचे रुंदीकरण रखडले आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी कामे सुरू आहेत. त्यात या रस्त्यावर वाहनाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे वाहतूककोंडी नित्याचीच बाब झाली आहे. या रस्त्यावर गेल्या पाच वर्षांत या साडेतीन किलोमीटरच्या रस्त्यावर ५० हून अधिक अपघात होऊन त्यात २५ बळी गेले आहेत. त्यामुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला आहे. कात्रज-कोंढवा रस्त्यावर एका शिक्षिकेचा अपघात झाला. त्यामुळे या रस्त्यावरील अपघाताचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कात्रज-कोंढवा ८४ मीटरचा डीपी रोड आहे. या कामाला ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी मान्यता दिली आहे.

# महापालिकांमध्ये आढळले १५ लाख दुबार मतदार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील मतदार याद्यांमधील दुबार मतदारांचा शोध घेतला जात असून आतापर्यंत १५ लाख दुबार मतदार सापडले आहेत. सर्व महापालिकांचा विचार करता पाच ते २० टक्केपर्यंत दुबार मतदार आढळून आले असून मुंबई महापालिकेत हे प्रमाण ७ टक्के असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. राज्यातील महापालिकांच्या प्रारुप मतदार याद्या जाहीर झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी दुबार मतदारांचा मुद्दा उपस्थित करीत बोगस मतदार शोधून काढण्याची मागणी राज्य निवडणूक आयोगाकडे केली होती. त्यानुसार आयोगाने महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर (**) असे चिन्ह नमूद करण्याचे आणि असे मतदार कुठल्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहेत याची खातरजमा करण्याचे आदेश पालिका आयुक्तांना दिले होते. आज दुबार मततदारांबाबत विचारले असता, मुंबई महापालिकेने प्रारुप मतदार यादीनंतर ११ लाख दुबार मतदार असल्याचा अंदाज व्यक्त केला होता. बृहन्मुंबई महानगरपालिकेने संभाव्य दुबार मतदारांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली (ॲप्लिकेशन) विकसित केली आहे. इतरही महानगरपालिकांनी विविध तंत्रांचा वापर करून संभाव्य दुबार नावांबाबत दक्षता घेतली आहे. त्यामुळे दुबार मतदारांची संख्या घटली असून मुंबईत हे प्रमाण ७ टक्के तर सर्व महापालिकामध्ये ५ ते २० टक्केच्या प्रमाणात दुबार मतदार आढळून येत आहेत. ही प्रक्रिया अजूनही सुरूच असल्याची माहिती वाघमारे यांनी दिली.

महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या विधानसभा मतदारसंघाच्याच मतदार याद्या वापरल्या जातात. संबंधित कायद्यांतील तरतुदींनुसार राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित करून, त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या याद्या महानगरपालिका निवडणुकांसाठी प्रभागनिहाय विभाजित केल्या आहेत. या याद्यांतील नावे वगळण्याचा किंवा नव्याने नावे समाविष्ट करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही; परंतु त्यातील दुबार नावांबाबत मात्र राज्य निवडणूक आयोगाने पुरेपूर दक्षता घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### 'मनसे स्टाईल'ने दणका

**मुंबई राज्यातील 29 हानगरपालिकांच्या निवडणुकांचा बिगुल वाजताच महाराष्ट्र नवनिर्माण सेना ॲक्शन मोडमध्ये आली आहे. मतदार याद्यांमधील घोळावरून मनसेचे मुंबई अध्यक्ष संदीप देशपांडे यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. निवडणूक आयोगाने बोगस मतदारांवर कारवाई केली नसेल, तर आता आम्हीच बघून घेऊ. जिथे बोगस मतदार आढळेल, तिथे त्याला 'मनसे स्टाईल'ने दणका देऊ, असा सज्जड इशारा देशपांडे यांनी दिला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना संदीप देशपांडे यांनी आपला संताप व्यक्त केला. ते म्हणाले की, मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे यांसारख्या प्रमुख शहरांमधील मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस नावे घुसडण्यात आली आहेत. याबाबत मनसेने केवळ आरोप केले नाहीत, तर त्यासंदर्भातील ठोस पुरावेही निवडणूक आयोगाला सादर केले होते. मात्र, दुर्दैवाने आयोगाने त्यावर वेळीच कोणतीही कठोर कारवाई केली नाही. आता थेट निवडणुका जाहीर झाल्या आहेत, त्यामुळे हा घोळ तसाच राहिला आहे.**




# पुणे महापालिका निवडणुक महाविकास आघाडी एकत्रच लढणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेची आगामी निवडणूक महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार ) आणि शिवसेना (ठाकरे) पक्षाने एकत्रित लढविण्याचा निर्णय घेतला आहे. महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांशी याबाबत चर्चा करण्यात आली असून, त्यांनी दिलेल्या आदेशानंतर महापालिका निवडणूक एकत्रित लढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या तिन्ही पक्षांच्या शहरातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची प्राथमिक बैठक सोमवारी शहर काँग्रेसच्या कार्यालयात झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला रोखण्यासाठी महाविकास आघाडीत सहभागी असलेल्या तिन्ही पक्षांनी एकत्र येणे गरजेचे आहे. त्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. भाजपविरोधातील लढाई लढण्यासाठी इतर समविचारी पक्षांनाही सोबत घेण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना (ठाकरे) पक्षाचे शहराध्यक्ष संजय मोरे, गजानन थरकुडे या वेळी उपस्थित होते. गेल्या आठ वर्षांमध्ये पुणेकरांवर अन्याय करणाऱ्या आणि महापालिकेच्या तिजोरीची स्वत:च्या स्वार्थासाठी लूट करणाऱ्या भाजपसह महायुतीमधील पक्षांना सत्तेपासून दूर करण्यासाठी राजकीय पक्षांनी एकत्रित येऊन निवडणूक लढावी, अशी चर्चा या बैठकीत करण्यात आली. शिंदे म्हणाले, 'अधिकाधिक नगरसेवक निवडून आणत महापालिकेवर महाविकास आघाडीचा झेंडा कसा रोवता येईल, याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

**मागील आठ वर्षांत पुण्याचा विकास थांबला असून भ्रष्टाचाराने माखलेल्या भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी महाविकास आघाडी कटिबद्ध आहे. स्थानिक पातळीवर परिस्थितीनुसार कोणाला सोबत घ्यायचे याचा निर्णय घ्यावा, असे प्रदेश काँग्रेसने सांगितले आहे. भाजपविरोधात लढण्यासाठी तयार असलेल्या सर्व पक्षांची एकजूट करण्यावर आमचे एकमत झाले आहे.'**

राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे प्रशांत जगताप म्हणाले, 'महापालिकेच्या निवडणुकीत भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी समविचारी पक्षांना सोबत घेण्याबाबत चर्चा सुरू आहे.

उमेदवारी देताना कोणत्या पक्षाला किती आणि कोणत्या जागा द्यायच्या हे ठरविण्यासाठी पुढील दोन ते तीन दिवसात बैठक होईल. गेल्या निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर कोण उमेदवार होता, तसेच तिन्ही पक्षांचा संयुक्त जाहीरनामा कसा असेल, यावर बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे. भाजपने हजारो कोटींचा भ्रष्टाचार केला असून पुणे शहराला वेठीस धरले आहे. शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीच्या बाबतीत पुण्याचा देशात अव्वल क्रमांक लागला आहे.

# निवडणुकीची घोषणा होताच दादांचा मास्टरस्ट्रोक

- **काँग्रेस-शरद पवार गटासह BJP ला मोठा धक्का; रात्री पुण्यातील भेटीने रंगली चर्चा**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील सर्वच महानगरपालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. इच्छुक उमेदवारांची चाचपणी, मुलाखती, केलेल्या कामांचा आढावा आणि जनसंपर्काची पडताळणी अशा प्रक्रिया सर्वच पक्षांमध्ये सुरू झाल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर सांगली–मिरज–कुपवाड महानगरपालिकेच्या राजकारणात मोठी



उलथापालथ घडण्याची चिन्हं स्पष्ट दिसू लागली आहेत. येथील माजी महापौरांसह पंधरा माजी नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वाटेवर असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. या सर्व नेत्यांनी सोमवारी रात्री पुण्यात जाऊन उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांची भेट घेतली असून, या भेटीने जिल्ह्यातील राजकीय समीकरणे ढवळून निघाली आहेत.


या भेटीदरम्यान पक्षप्रवेशाबाबत सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. लवकरच मिरज येथे अजित पवार यांच्या उपस्थितीत या सर्व माजी नगरसेवकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिकृत प्रवेश होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे या संभाव्य पक्षप्रवेशात भाजप, काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाशी संबंधित माजी नगरसेवकांचा समावेश आहे.

# पुण्यात भाजप स्वबळावर लढणार

## भाजपचा राष्ट्रवादी काँग्रेसशी सामना; मनपा निवडणूक जाहीर होताच फडणवीसांच्या गुगल्या


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत आगामी महापालिका निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या निवडणूक वेळापत्रकानुसार, 23 ते 30 डिसेंबरपर्यंत उमेदवारांना आपली उमेदवारी दाखल करता येईल. त्यानंतर 31 डिसेंबर रोजी अर्जांची छाननी केली जाईल. 2 जानेवारी 2026 ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे 3 जानेवारी 2026 रोजी अंतिम उमेदवारी यादी जाहीर केली जाईल, तसेच उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप करता येईल. त्यानंतर 15 जानेवारी 2026 रोजी मतदान, तर त्यानंतर दुसऱ्या दिवशी 16 जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित होईल. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकीच्या तारखा घोषित केल्या आहेत. 15 जानेवारीला सगळ्या महानगरपालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. कारण, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था ही प्रशासकांच्या भरवशावर चालवणे हे लोकशाहीला अभिप्रेत नव्हते. तथापि न्यायालयाच्या निर्णयामुळे दीर्घकाळ या संस्था निर्वाचित प्रतिनिधींच्या विना होत्या. आता पुन्हा या निवडणुका होत आहेत आणि आम्हाला विश्वास आहे की या निवडणुकांमध्ये आमच्या शासनाने केले काम पाहता पुन्हा कौल आमच्या बाजूने येईल आणि जनता शहर विकासाची संधी आम्हाला देईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. महायुती या निवडणुका एकत्र लढणार की स्वबळावर, असा प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही महायुती करण्याचा प्रयत्न करत आहोत. जास्तीत जास्त ठिकाणी भाजप आणि शिवसेनेची युती होईल, काही ठिकाणी भाजप शिवसेना राष्ट्रवादी युती होईल, एखाद दोन ठिकाणी भाजप-राष्ट्रवादी युती देखील होईल. आता पुण्यात मात्र अजित पवार आणि आमची चर्चा झाली आहे, भाजपने 5 वर्षात चांगल्या पद्धतीने पुण्याचा विकास केला आहे, त्यामुळे कदाचित पुण्यात राष्ट्रवादी आणि भाजप आमने-सामने लढताना तुम्हाला दिसेल. परंतु, ही मैत्रीपूर्ण लढत असणार आहे, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूर महानगरपालिका आणि चंद्रपूर महानगरपालिकेत आरक्षण हे 50 टक्क्यांच्या वर गेले आहे. परंतु, माननीय सर्वोच्च न्यायालयानेच सांगितले आहे की यांच्या निवडणुका घ्या, फक्त जी निकाल असेल तो आमच्या अंतिम निर्णयाच्या आधीन राहील आणि अंतिम निर्णयात जो काही निर्णय घेऊ तो या दोन महानगरपालिकांना लागू होईल, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.**





# नऱ्हे येथे भव्य बालजत्रा; हजारो बालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरात बालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या भव्य बालजत्रेला मोठा प्रतिसाद लाभला. या बालजत्रेमध्ये हजारो बालकांनी सहभाग घेत जत्रेचा मनसोक्त आनंद लुटला. लहान मुलांसाठी विविध प्रकारची पाळणी, खेळणी, वॉटर गेम्स, छोट्या रेल्वेची सफर, उंटावरची स्वारी यासह विविध प्रकारच्या भेळ, खाद्यपदार्थ व खाऊ गल्लीची आकर्षक व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण परिसर बालहास्य, आनंद आणि उत्साहाने भारून गेला होता.




**माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, यशवंत लायगुडे यांनी केले आयोजन**

या बालजत्रेचे आयोजन माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे आणि युवा नेते यशवंतबापू लायगुडे यांनी केले होते. समाविष्ट गावांमधील व नव्याने विकसित होत असलेल्या भागांमध्ये लहान मुलांसाठी अशा प्रकारचे मनोरंजनाचे कार्यक्रम सहज उपलब्ध होत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन बालकांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या बालपणात सुंदर आठवणी तयार व्हाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आल्याचे राजाभाऊ लायगुडे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना युवा नेते यशवंतबापू लायगुडे म्हणाले की, "लहान मुलांचे बालपण आनंदी, सुरक्षित आणि खेळकर असावे, यासाठी भविष्यातही अशा बालजत्रा तसेच बालचित्रपट, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन नियमितपणे करण्यात येणार आहे." समाजाच्या सर्वांगीण विकासात बालकांचा आनंद व मानसिक विकास महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला सचिन मोरे, माजी नगरसेविका नीताताई दांगट, राजश्रीताई नवले, बापूसाहेब पोकळे, सागर भूमकर, सारंग नवले, पै. तुषार पोकळे, माजी जिल्हा परिषद सदस्य जयश्रीताई पोकळे, कोमल सुशांत कुटे, कोमल सतीश कुटे यांच्यासह विविध मान्यवर आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बालजत्रेस उपस्थित राहिलेल्या पालकांनी व बालकांनी राजाभाऊ लायगुडे व यशवंतबापू लायगुडे यांच्या या उपक्रमाचे भरभरून स्वागत केले. "आमच्या मुलांसाठी असा आनंददायी आणि सुरक्षित कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे मनापासून आभार," अशी भावना अनेक पालकांनी व्यक्त केली. एकूणच नऱ्हे येथील ही बालजत्रा सामाजिक बांधिलकी आणि बालकांच्या आनंदाचे उत्तम उदाहरण ठरली.

## भोर, वेल्हा व मुळशीतील जलजीवन मिशनच्या कामांची चौकशी

**राजगड (दै. आरंभ पर्व)**

भोर, वेल्हा (राजगड) आणि मुळशी तालुक्यांत जलजीवन मिशनअंतर्गत मोठ्या प्रमाणावर अनियमितता, अर्धवट कामे तसेच कामे पूर्ण होण्यापूर्वीच ठेकेदारांची बिले अदा झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार शंकर मांडेकर यांनी राज्याचे पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांची भेट घेऊन दोषी अधिकारी व ठेकेदारांची चौकशी करण्याची मागणी केली. याची गंभीर दखल घेत मंत्री पाटील यांनी संबंधित प्रकरणांची तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सचिवांना दिले आहेत. भोर, राजगड आणि मुळशीचे आमदार शंकर मांडेकर यांनी यापूर्वी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला होता. तसेच नुकतीच पाणीपुरवठामंत्री पाटील यांना निवेदन देत जलजीवन मिशनमधील सर्व कामांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली. त्यानुसार या तीनही तालुक्यांतील जलजीवन मिशनच्या कामांची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यावेळी आमदार मांडेकर म्हणाले की, नागरिकांना स्वच्छ पाणी मिळणे हा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे अर्धवट कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना देण्यात यावेत. निकृष्ट व अनियमित कामांबाबत संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी.

## सिंहगडाचे पावित्र्य पुन्हा येऊ लागलंय धोक्यात

- **वनविभाग - संयुक्त वनव्यवस्थापन समितीसमोर काटेकोर वाहन तपासणीचे मोठे आव्हान...**
- **शिवप्रेमींना जिल्हा प्रशासनाकडून ठोस कारवाईची अपेक्षा !**

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**

गेल्या सतरा ते अठरा वर्षांपासून ऐतिहासिक किल्ले सिंहगडावर लागू असलेली मद्य आणि मांसाहाराची बंदी पुन्हा एकदा धोक्यात येण्याची शक्यता निर्माण होत चालली आहे. खरंतर आजपर्यंत केवळ जागृत शिवप्रेमी संघटनांच्या सहकार्याने स्थानिक वनविभाग प्रशासन, घेरा सिंहगड वनव्यवस्थापन समिती ने संयुक्तपणे दारुबंदी मोहीम यशस्वी करुन दाखवली होती. मात्र गेल्या पाच - सहा महिन्यांपासून काही उद्दाम, बेशिस्त व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मद्यपी पर्यटकांकडून सिंहगडावर पुन्हा दारू, धूम्रपानाचे साहित्य व मांसाहारी पदार्थ घेऊन जाण्याचे प्रयत्न सुरू झाल्याने सिंहगडाच्या पावित्र्यालाच धोका निर्माण झालेला आहे.

शनिवार–रविवार तसेच इतर सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी किल्ले सिंहगडावर येणाऱ्या पर्यटकांची संख्या खुप मोठी असते. या अशा परिस्थितीत सिंहगड घाट रस्ता रहदारीचे नियमन व व्यवस्थापन करत प्रत्येक वाहनाची कसून तपासणी करणे वनविभाग व स्थानिक वनव्यवस्थापन समितीच्या सुरक्षा रक्षकांसाठी अत्यंत जिकिरीचे ठरत आहे. गोळेवाडी तपासणी नाक्यावरून मोठ्या प्रमाणात वाहने गडाचे दिशेने येजा करत असल्याने गडावर जाणाऱ्या वाहनांचे तपासणीमध्ये अडचणी निर्माण होत आहेत. तरीही वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी दक्ष राहून शक्य तेवढी तपासणी करत असल्याने काही मद्यपी दारुच्या बाटल्या घेऊन जाताना सापडतात.

काल रविवारी त्याचा प्रत्यय देखील दिसुन आला . वनविभागाचे वनपरिमंडळ अधिकारी व घेरा सिंहगड संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे सचिव समाधान पाटील भाऊसाहेब यांनी रविवारी दिवसभर वाहन तपासणी मोहिमेची काटेकोरपणे अंमलबजावणी करून

वाहन तपासणीवर भर दिल्याने वनव्यवस्थापन समिती सुरक्षारक्षकांनी संशयास्पद वाहनांची कसुन तपासणी करून मद्याच्या बाटल्या जप्त करुन त्या जागीच नष्ट केल्या..

सध्या गडावर जाणाऱ्यांकडुन ज्या पद्धतीने दारु सापडत आहे त्यावरून गडावर सहजपणे दारु नेण्याचे धाडस पर्यटक करताना दिसतात. वाहन तपासणी करताना अनेक मद्यपी, संशयित पर्यटकांकडून सुरक्षा रक्षकांशी हुज्जत घालण्याचे प्रकार सर्रास घडतात . वाहन तपासणीला सातत्याने संबंधींताकडुन विरोध होत असतो. पुढारी व नेत्यांची नावे सांगून दडपशाही करुन काही मंडळी जबरदस्तीने गडावर प्रवेश करण्याचे प्रयत्न करत असतात. विशेष म्हणजे काही शासकीय अधिकारी , कर्मचारी देखील त्यांच्या वाहनातून गडावर मद्य नेण्याचा प्रयत्न करताना दिसुन येते आहेत. त्यामुळे येथील दारूबंदीची अंमलबजावणी करणे कठीण बनत चालले आहे.

## सोसायटीचा मेंटेनन्स थकवाल तर... याद राखा!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




शहरातील बहुतांश मध्यमवर्गीय कुटुंबांचे आयुष्य आज सहकारी गृहनिर्माण सोसायटीभोवती फिरते. घर खरेदी केल्यानंतर मिळणारी सुरक्षितता, स्वच्छता, पाणी, वीज, लिफ्ट, सुरक्षा रक्षक, पार्किंग, कचरा व्यवस्थापन-या सगळ्यांचा कणा म्हणजे सोसायटीचा मेंटेनन्स. पण अलीकडे एक चिंताजनक प्रवृत्ती वाढताना दिसते आहे-मेंटेनन्स वेळेवर न भरण्याची. मेंटेनन्स म्हणजे केवळ एक मासिक रक्कम नाही; तो सोसायटीच्या दैनंदिन शिस्तीचा आणि सामूहिक जबाबदारीचा कणा आहे. काही सदस्य "आज नाही, उद्या देऊ" म्हणत महिनोन्महिने थकबाकी ठेवतात. सुरुवातीला ही बाब किरकोळ वाटते, पण हळूहळू त्याचे परिणाम संपूर्ण सोसायटीला भोगावे लागतात. कर्मचारी वेतन थकते, लिफ्ट दुरुस्ती रखडते, पाणीपुरवठा विस्कळीत होतो, सुरक्षा व्यवस्था कमकुवत होते. एकाच्या निष्काळजीपणाचा फटका सगळ्यांना बसतो.

कायद्याच्या दृष्टीनेही मेंटेनन्स थकवणे धोक्याचे आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा आणि मॉडेल बाय-लॉज स्पष्ट आहेत- थकबाकीदारांवर दंडात्मक व्याज, नोटीस, सेवा मर्यादा, मतदानाचा हक्क नाकारणे, अगदी जप्तीपर्यंतची तरतूद आहे. **"माझ्या घराचा वापर मी करतो, मग काय फरक पडतो?"** हा युक्तिवाद न्यायालयात टिकत नाही. कारण सोसायटी ही वैयक्तिक नव्हे, सामूहिक संस्था आहे.

काही जण आर्थिक अडचणींचे कारण देतात. अडचणी असतील तर संवाद हवा, टाळाटाळ नव्हे. समितीसमोर अर्ज करा, हप्त्यांची विनंती करा, तोडगा निघू शकतो. पण बेजबाबदारपणे थकबाकी ठेवून "याद राखा" असा इशारा समितीकडून मिळाला, तर त्याला जबाबदार तुम्हीच असता.

**मेंटेनन्स भरणे म्हणजे कोणावर उपकार नाही;** तो तुमच्या स्वतःच्या घराच्या मूल्याची गुंतवणूक आहे. आज मेंटेनन्स थकवून थोडे पैसे वाचतील, पण उद्या इमारत जीर्ण झाली, सेवा खंडित झाल्या, बाजारमूल्य घसरले-तेव्हा नुकसान कोणाचे? तुमचेच.

**सोसायटी चालते ती शिस्तीवर; आणि शिस्त टिकते ती वेळेवर भरलेल्या मेंटेनन्सवर.**

## धोकादायक इसम स्थानबद्ध

**शिरूर (दै. आरंभ पर्व)**



पुणे ग्रामीण जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या नगरपालिका, नगरपरिषद तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात, यासाठी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार व सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या धोकादायक व्यक्तींविरुद्ध विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शिरूर तालुक्यातील एका धोकादायक इसमावर महाराष्ट्र प्रतिबंधक नजरकैद (एमपीडीए) कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. शिरूर पोलीस स्टेशन हद्दीतील गोलेगाव रोड, वासल्य हॉस्पिटल शेजारी राहणारा दिपक बबन गुंजाळ (वय ३३) याच्याविरुद्ध यापूर्वी अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणे, संगनमत करून घातक हत्यारांनी इच्छापूर्वक दुखापत व जबर दुखापत करणे, शिवीगाळ व दमदाटी करणे असे ३ गंभीर गुन्हे दाखल होते. तो सराईत व धोकादायक असल्याचे निष्पन्न झाल्याने शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी त्याच्याविरुद्ध एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल (पुणे ग्रामीण) यांच्याकडे सादर केला.

# केवळ आश्वासन नव्हे, संघर्षातून उभे राहिलेले नेतृत्व



**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

- **श्री. अशोक (बापू) एकनाथ राजीवडे**
- **शिक्षण : बी.ए.**
- **विश्वस्त : श्रीनाथ म्हस्कोबा देवस्थान ट्रस्ट**
- **उपाध्यक्ष : पुरंदर–हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष**




**(दै. आरंभ पर्व)**

राजकारण जर समाजकारणाशी नातं तोडून बसलं, तर सामान्य माणसाचा आवाज दबला जातो. म्हणूनच जमिनीशी जोडलेलं, संघर्षातून घडलेलं आणि लोकांच्या प्रश्नांशी प्रामाणिक राहिलेलं नेतृत्व आज काळाची गरज बनली आहे. पुरंदर तालुक्यातील कोडीत बुद्रुक या गावात शेतकरी कुटुंबात जन्मलेले अशोक (बापू) एकनाथ राजीवडे हे असेच नेतृत्व म्हणून तुकाई दर्शन–फुरसुंगी परिसरात पुढे येत आहेत.

शेतीतील कष्ट आणि मेहनतीची जाण असल्यामुळे विकास म्हणजे केवळ कागदावरचे प्रस्ताव नव्हेत, तर प्रत्यक्ष जमिनीवर दिसणारा बदल असतो, ही त्यांची ठाम भूमिका आहे. गेली वीस वर्षे तुकाई दर्शन व फुरसुंगी परिसरात वास्तव्यास असताना, पाणीटंचाई, रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापन, अपुऱ्या नागरी सुविधा यांसारख्या प्रश्नांवर त्यांनी केवळ निवेदने देऊन थांबण्याऐवजी आंदोलन, पाठपुरावा आणि संघर्षाचा मार्ग स्वीकारला.

या परिसरात नोकरीनिमित्त आलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबांचे प्रश्न आजही दुर्लक्षित राहतात. महापालिकेच्या योजनांचा लाभ अनेकदा कागदोपत्रीच मर्यादित राहतो. मिशन महानगरपालिकाच्या माध्यमातून हे चित्र बदलणे, हा त्यांचा स्पष्ट राजकीय अजेंडा आहे. "प्रभागातील कर भरणारा नागरिक विकासापासून वंचित राहणार नाही," ही त्यांची ठाम भूमिका आहे.

धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी आपली भूमिका स्पष्ट ठेवली आहे. श्रीनाथ म्हस्कोबा देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त म्हणून सेवा करताना श्रद्धा आणि व्यवस्थापन यांचा समतोल राखण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. धार्मिक संस्थांचे राजकारण न करता त्या समाजहिताचे केंद्र बनाव्यात, हा त्यांचा दृष्टिकोन आहे.

राजकीय पातळीवर पुरंदर–हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असताना, जनतेचे प्रश्न शासनदरबारी ठामपणे मांडणे, शासकीय योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आणि सत्तेला जाब विचारणे, ही भूमिका त्यांनी वेळोवेळी घेतली आहे. केवळ निवडणुकीपुरते दिसणारे नेते नव्हे, तर वर्षभर नागरिकांच्या सोबत उभे राहणारे कार्यकर्ता-नेतृत्व, हीच त्यांची ओळख आहे.

आज मिशन महानगरपालिकाच्या पार्श्वभूमीवर तुकाई दर्शन–फुरसुंगी परिसराला केवळ आश्वासनांची गरज नाही, तर निर्णयक्षम, धाडसी आणि लोकांच्या प्रश्नांसाठी भिडणाऱ्या प्रतिनिधीची गरज आहे. जमिनीशी जोडलेला कार्यकर्ता म्हणून, आणि स्पष्ट राजकीय भूमिकेसह अशोक (बापू) राजीवडे यांनी विकासासाठी लढण्याची तयारी दाखवली आहे.

लोकांचा विश्वास, साथ आणि मतदानाची ताकद मिळाल्यास, प्रभागातील प्रत्येक प्रश्नासाठी महापालिकेत आवाज उठवला जाईल, अशी ठाम ग्वाही त्यांनी दिली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जपानी आध्यात्मिक ॲनिमेशन चित्रपट ड्रॅगन हार्ट २५ डिसेंबरपासून हिंदीत

पुणे (आरंभ पर्व) : जपानमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या आणि १६ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये पुरस्कार प्राप्त 'ड्रॅगन हार्ट – ॲडव्हेंचर्स बियॉन्ड धिस वर्ल्ड' या ॲनिमेशन चित्रपटाचा हिंदी डबिंग आवृत्ती येत्या २५ डिसेंबर रोजी भारतीय टेलिव्हिजनवर प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाला ९८ व्या अकादमी पुरस्कारांच्या फीचर ॲनिमेशन श्रेणीत पात्रता मिळाल्याने त्याबद्दलची उत्सुकता अधिक वाढली आहे. या चित्रपटाच्या हिंदी डबिंगमध्ये बॉलीवूडमधील ज्येष्ठ गायक आणि डबिंग आर्टिस्ट सुदेश भोसले यांच्यासह अनेक दिग्गज कलाकारांनी काम केले आहे. अशी माहिती चित्रपटाच्या टीमने पत्रकार परिषदेत दिली. पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे झालेल्या पत्रकार परिषदेला कोटा नोगुची (जपानी, दक्षिण आशिया हॅपी सायन्सचे प्रादेशिक संचालक).शिंदो इतो (जपानी, जपानमधील हॅपी सायन्सच्या नासू प्रमुख), माई अरिमोटो (जपानी, जपानमधील हॅपी सायन्सचे अधिकारी आणि शिंदो इतोचे भाषांतरकार), नाओको इतो (जपानी, जपानमधील हॅपी सायन्सचे स्टाफ), नीता कालवे आदि मान्यवर उपस्थित होते. चित्रपटाचे दिग्दर्शन इसामू इमाकाके, तर कथा व निर्मिती र्युहो ओकावा यांची आहे.

### सुनीता लाड-भामरे यांच्यासाठी पुस्तक महोत्सव ठरला 'घरवापसी'चा क्षण




पुणे (आरंभ पर्व) : लेखकाच्या आयुष्यात काही क्षण असे येतात, जेव्हा ठिकाण, आठवण आणि उद्देश यांचा शांतपणे संगम होतो. सिंगापूरस्थित लेखिका सुनीता लाड - भामरे यांच्यासाठी असाच एक क्षण पुणे पुस्तक महोत्सव २०२५ मध्ये अनुभवता आला. हा महोत्सव त्यांच्या माजी शिक्षण संस्था असलेल्या फर्ग्युसन कॉलेजच्या ऐतिहासिक आवारात आयोजित करण्यात आला होता. कॉलेजच्या कॅम्पसमध्ये पाऊल ठेवणे म्हणजे त्यांच्यासाठी जणू एका जिवंत आठवणींच्या स्क्रॅपबुकमध्ये प्रवेश करण्यासारखे होते. सावली देणारे रस्ते, जुनी वर्गखोली आणि मोकळे अंगण हे त्यांच्या विद्यार्थी जीवनाच्या आठवणींनी भरलेले होते. एका लेखिका म्हणून, आमंत्रित अतिथी म्हणून याच ठिकाणी परत येणे त्यांच्यासाठी भावनिक आणि आत्मविश्वास देणारे होते. याबद्दल बोलताना सुनीता लाड- भामरे म्हणाल्या, "फर्ग्युसन कॉलेजने मला विचार आणि अभिव्यक्तीची पहिली मजबूत बैठक दिली. माझ्या स्वतःच्या पुस्तकांसह आणि कथा घेऊन येथे परतणे ही माझ्यासाठी खूप वैयक्तिक गोष्ट आहे."

### रिंकू राजगुरूची 'आशा' १९ डिसेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला



पुणे (आरंभ पर्व) : काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'आशा' चित्रपटाच्या ट्रेलरने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली आहे. 'बाई अडलीये... म्हणूनच ती नडलीये' ही प्रभावी आणि अर्थपूर्ण टॅगलाईन ट्रेलरची जाणीव अधिक ठळक करते. महिलांच्या संघर्षांचा, त्यांच्या जिद्दीचा आणि समाजाशी सुरू असलेल्या लढ्यांचा संवेदनशील, वास्तववादी प्रवास 'आशा' या चित्रपटातून उलगडताना दिसतो. ट्रेलरमध्ये रिंकू राजगुरूने साकारलेली 'आशा' ही केवळ एक व्यक्तिरेखा न राहाता, ती अनेक स्त्रियांची प्रतीक ठरते. गावोगावी लोकांच्या आरोग्याची जबाबदारी पेलणारी आरोग्य सेविका, कुटुंबातील ताणतणावांना सामोरं जाणारी स्त्री, अन्यायाविरोधात ठाम उभी राहाणारी योद्धा आणि स्वतःचं ध्येय साध्य करण्यासाठी न थकता झगडणारी व्यक्ती. आशाचे हे सगळे पैलू ट्रेलरमध्ये प्रभावीपणे दिसतात. तिच्या आयुष्यातील धग, वेदना आणि तळमळ प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी आहे. या चित्रपटातील 'चालत रहा पुढे' हे प्रेरणादायी गाणंही सध्या चर्चेत आहे. आशाच्या संघर्षाला ऊर्जा देणारं हे गाणं सोशल मीडियावर भरभरून दाद मिळवत असून अनेकांसाठी ते प्रेरणेचा सूर ठरत आहे.

### सराईत हातभट्टीवाला एमपीडीए कायद्यान्वये कारागृहात स्थानबद्ध



हवेली तालुका (आरंभ पर्व) : पुणे ग्रामीण जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या नगरपालिका, नगरपरिषद तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात, यासाठी अवैध धंदे करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार हवेली तालुक्यातील सराईत हातभट्टीवाल्यावर महाराष्ट्र प्रतिबंधक नजरकैद (एमपीडीए) कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. ऊरुळीकांचन पोलीस स्टेशन हद्दीतील शिंदवणे (ता. हवेली, जि. पुणे) येथे राहणारा क्रिश जॉनी राठोड (वय २०, रा. काळेशिवार, शिंदवणे) हा गावठी हातभट्टीची दारू तयार करणे, विक्री व वाहतूक करणे या अवैध धंद्यात सराईत असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत यापूर्वी ५ गुन्हे दाखल असून, तक्रारदारांना धमकावण्याचे प्रकारही समोर आले होते. त्यामुळे तो सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा ठरत असल्याचे पोलिसांच्या तपासात स्पष्ट झाले. ऊरुळीकांचन पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी या इसमाविरुद्ध एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल (पुणे ग्रामीण) यांच्याकडे सादर केला. प्रस्तावाच्या तपासणीनंतर तो पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे जितेंद्र डुडी यांच्याकडे पाठविण्यात आला. त्यानुसार, एमपीडीए कायदा (मुख्य अधिनियम १९८१, सुधारणा अधिनियम २०२५) अंतर्गत दि. १२/१२/२०२५ रोजी स्थानबद्धतेचा आदेश पारित करण्यात आला. या आदेशान्वये, दि. १३/१२/२०२५ रोजी पोलिसांनी क्रिश जॉनी राठोड यास ताब्यात घेऊन मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दाखल केले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व ऊरुळीकांचन पोलीस स्टेशनच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.












## थोडक्यात पण महत्वाचे



### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे विशेष मार्गदर्शन

**नागपूर (आरंभ पर्व) :** महाराष्ट्र बटालियन आर्टिलरी एनसीसी, नागपूरच्या कॅडेट्सना विधान भवन येथे महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विशेष मार्गदर्शन केले. यानिमित्ताने आयोजित प्रेरणादायी संवाद कार्यक्रमात डॉ. गोऱ्हे यांनी कॅडेट्सना आपल्या जीवनातील अनुभवांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणी सांगितल्या. त्या काळात आपण राष्ट्रीय सेवा योजना (NSS) मध्ये सक्रिय सहभाग घेतला होता, असे सांगत ग्रामीण भागात केलेल्या सामाजिक कार्याचा उल्लेख त्यांनी केला. महिलांचे कल्याण, वैद्यकीय तपासणी शिबिरे तसेच विविध जनजागृती उपक्रमांमधील सहभागामुळे समाजाकडे पाहण्याची दृष्टी अधिक व्यापक झाली, असे त्यांनी नमूद केले. तरुण वयात सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि सेवाभाव अंगीकारणे हे व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते, असेही त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थी जीवनातील अनेक रंजक, प्रेरणादायी आणि शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध अनुभव त्यांनी कॅडेट्सना सांगितले.

### गडावर दारू नेण्याचा प्रयत्न उघड; तीन कॅन जप्त करून जागीच नष्ट

**सिंहगड (आरंभ पर्व) :** गडावर जात असताना एका कारमध्ये दोन जोडपी असल्याचे निदर्शनास आले. तपासणीदरम्यान संबंधितांकडे किंगफिशरचे तीन कॅन आढळून आले. गड परिसरात सिगारेट व दारू नेण्यास बंदी असल्याची माहिती सुरक्षा रक्षकांनी दिली असता, संबंधितांनी सुरुवातीला केवळ सिगारेट असल्याचे सांगत दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या बोलण्यात संशयास्पद संभ्रम जाणवल्याने वनपाल व सचिव समाधान पाटील यांनी सुरक्षा रक्षकांना वाहन तपासणीच्या स्पष्ट सूचना दिल्या. तपासणी करताच चालकाच्या सीटच्या मागे दोन लहान कॅन सापडले. पुढील चौकशीत आणखी काही आहे का, असे विचारून कडक शब्दांत समज दिल्यानंतर तिसरा कॅनही बाहेर काढण्यात आला. विशेष म्हणजे कारमधील दोन्ही तरुणी या प्रकारात समवेत असलेल्या तरुणांचे समर्थन करताना दिसून आल्या. त्यानंतर संबंधितांना जाब विचारण्यात आला आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसमोर तीनही कॅन स्वतःहून नष्ट करण्यास भाग पाडण्यात आले. या कारवाईवेळी तपासणी नाक्यावर धनराज सांबरे, शंकर डोंगरे, अनिल जोरकर, सचिन थोपटे, निलेश पायगुडे, नितीन गोळे व रमेश खामकर उपस्थित होते. नियमभंग केल्याबद्दल संबंधित वाहनास तात्काळ माघारी पाठवण्यात आले. गड परिसरातील शिस्त व पर्यावरण संरक्षणासाठी अशी तपासणी पुढेही काटेकोरपणे सुरू राहणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## १ लाख परत मिळाले; रिक्षाचालकाच्या माणुसकीचा आदर्श



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आजच्या डिजिटल युगात ऑनलाइन फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना, धानोरी परिसरात घडलेल्या एका घटनेने माणुसकीवरचा विश्वास पुन्हा एकदा दृढ केला आहे. चुकून दुसऱ्याच खात्यात गेलेले तब्बल ₹१,००,००० अवघ्या काही वेळात प्रामाणिकपणाने परत मिळाल्याची ही हृदयस्पर्शी घटना आहे.

धानोरी येथे राहणाऱ्या एका कुटुंबात सकाळी Google Pay द्वारे व्यवहार करत असताना, पत्नीच्या खात्यातून पतीच्या खात्यात पैसे ट्रान्सफर करताना चुकून रक्कम एका अनोळखी UPI अकाउंटला गेली. पैसे गेल्याचे लक्षात येताच कुटुंबीय घाबरले. बँकेत तक्रार केल्यानंतर "प्रक्रिया वेळखाऊ आहे" असे उत्तर मिळाले. शेवटचा प्रयत्न म्हणून Google Pay वर संबंधित खात्याला संदेश पाठवून मोबाईल नंबर शेअर करण्यात आला आणि देवावर विश्वास ठेवण्यात आला.

काही वेळातच त्या अनोळखी व्यक्तीकडून फोन आला. विशेष म्हणजे, तो व्यक्तीही धानोरी परिसरातच असल्याचे समजले. त्याला घरी येण्याची विनंती केल्यानंतर थोड्याच वेळात एक तरुण रिक्षाचालक घरासमोर आला. घरात आल्यानंतर कोणतीही चर्चा न करता, कोणताही वाद न घालता

> **ही बातमी केवळ एका आर्थिक व्यवहाराची नसून, समाजात अजूनही चांगुलपणा आणि माणुसकी शिल्लक आहे, हे दाखवणारी प्रेरणादायी घटना ठरली आहे.**

त्या तरुणाने संपूर्ण ₹१,००,००० पुन्हा खात्यात ट्रान्सफर केले.

त्या तरुणाचे नाव गणेश पोळकर (रा. दौंड, जि. पुणे) असे असून तो वयाने साधारण २५ ते २७ वर्षांचा आहे. तो MPUC परीक्षेची तयारी करत असून, घरच्यांवर आर्थिक भार नको म्हणून रिक्षा चालवतो, असे समजते.

आजच्या काळात अर्ध्या तासात स्वतःहून घरी येऊन मोठी रक्कम परत करणं ही बाब दुर्मिळच म्हणावी लागेल. या घटनेमुळे "देव कधी कधी माणसाच्या रूपात भेटतो" ही भावना अनेकांच्या मनात घर करून गेली आहे.

ही घटना गणेश जगदाळे यांनी सोशल मीडियावर शेअर केली असून, "आज स्वामी समर्थ महाराज गणेश पोळकरांच्या रूपात भेटले" अशा शब्दांत त्यांनी आपली भावना व्यक्त केली आहे. माणुसकी, प्रामाणिकपणा आणि चांगले संस्कार आजही जिवंत आहेत, याचे हे जिवंत उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

# 'स्मार्ट' सिटीच्या गप्पा

## रस्ते, खड्डे आणि पाण्यापलीकडे आपण कधी जाणार?



> **आजही आपण रस्ते, खड्डे, पाणी यावरच आश्वासने देत आहोत, याचा अर्थ आपण अपयशी व्यवस्थेवर समाधान मानतो आहोत. जोपर्यंत आपण मूलभूत सेवांपलीकडे जाऊन शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, रोजगार, डिजिटल साक्षरता आणि सुशासन यावर केंद्रित होत नाही, तोपर्यंत 'स्मार्ट' हा शब्द फक्त पोस्टरवरच शोभेल. खरं तर प्रश्न साधा आहे. आपण फक्त समस्या सांगणारे नागरिक राहणार की उपाय मागणारे सजग नागरिक होणार? आणि सत्ताधारी फक्त आश्वासनांचे व्यापारी राहणार की भविष्यासाठी जबाबदार नियोजक बनणार? याची उत्तरं मिळाली, तरच आपण खऱ्या अर्थाने स्मार्ट होऊ.**

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

दर पाच वर्षांनी निवडणुका येतात, जाहीरनामे जाहीर होतात आणि पुन्हा तेच शब्द ऐकू येतात-रस्ते चांगले करू, खड्डे बुजवू, पाणीपुरवठा सुरळीत करू. हे प्रश्न महत्त्वाचे नाहीत असे मुळीच नाही; पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे इतकी दशकं उलटून गेली तरी आपण अजूनही याच मूलभूत प्रश्नांभोवतीच अडकून पडलो आहोत. जग 'स्मार्ट सिटी', 'ग्रीन सिटी', 'डिजिटल गव्हर्नन्स'च्या पुढच्या टप्प्यावर जात असताना आपण अजूनही खड्ड्यांमध्येच अडखळतो आहोत.

खरा प्रश्न हा नाही की रस्ते का खराब आहेत; खरा प्रश्न आहे-रस्ते दरवर्षी का खोदले जातात? पाण्याचा प्रश्न आहे; पण पाणीगळती, चोरी आणि नियोजनशून्य वितरणावर ठोस उपाय का होत नाही? हे सगळे प्रश्न तांत्रिक कमी आणि व्यवस्थात्मक जास्त आहेत. पण राजकीय चर्चेत हे मुद्दे येत नाहीत, कारण तिथे दीर्घकालीन दृष्टी लागते-आणि तीच दुर्मिळ झाली आहे.

'स्मार्ट' होणे म्हणजे फक्त एलईडी लाईट्स, सीसीटीव्ही कॅमेरे किंवा मोबाईल ॲप्स बसवणे नव्हे. स्मार्टपणा म्हणजे नागरिकांना सेवा वेळेत मिळणे, कामात पारदर्शकता असणे, निर्णय डेटा आणि गरजांवर आधारित असणे. आज एखाद्या नागरिकाला साध्या दाखल्यासाठी कार्यालयाच्या दहा फेऱ्या माराव्या लागतात, ही कोणती स्मार्ट व्यवस्था? ऑनलाईन सेवा कागदावर आहेत, पण प्रत्यक्षात बाबूशाहीचाच अडसर कायम आहे.

आपण वाहतूक कोंडीवर बोलतो; पण सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यावर ठोस चर्चा होत नाही. पार्किंगचा प्रश्न आहे; पण शहर नियोजनात पार्किंग धोरणच नाही. कचऱ्यावर बोलतो; पण कचरा निर्मिती कमी करण्यावर, पुनर्वापरावर आणि सर्क्युलर इकॉनॉमीवर गंभीर प्रयत्न दिसत नाहीत.

पावसाळा आला की शहर जलमय होते; पण पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन, जलसंधारण आणि नैसर्गिक नाल्यांचे संरक्षण हा विषय अजूनही फाईल्समध्येच अडकलेला आहे.

स्मार्ट शहराची खरी ओळख ही नागरिकांच्या सहभागातून होते. निर्णय प्रक्रियेत नागरिकांचा आवाज असतो का? प्रकल्पांचे सामाजिक ऑडिट होते का? खर्च आणि परिणाम याचा जाब कुणी विचारतो का? केवळ उद्घाटनांचे फोटो आणि फलक लावून स्मार्टपणाचा डंका पिटला जातो, पण प्रत्यक्षात नागरिकांचे जगणे सोपे झाले का, हा प्रश्न कोणी विचारत नाही.

## सासवड-जेजुरी मार्गावरील सीएनजी सेवा सुरळीत करा

- **जेजुरी व गोटेमाळ येथील सीएनजी पंप अनेक महिन्यांपासून बंद**
- **वाहनधारकांची मोठी कुचंबणा; सीएनजीसाठी करावी लागते वणवण**



**जेजुरी (दै. आरंभ पर्व)**

पुरंदर तालुक्यातील ग्रामीण भागासह पुणे–पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील जेजुरी आणि सासवडजवळील गोटेमाळ येथील सीएनजी पंप गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असल्याने सीएनजी वाहनधारकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या दोन्ही पंपांवर अवलंबून असलेली वाहने सध्या सासवड शहरातील एकमेव सीएनजी पंपावर इंधन भरण्यास येत असल्यामुळे तेथे दिवसरात्र प्रचंड गर्दी होत आहे. त्यातच सासवड येथील सीएनजी पंप अनेकदा 'ऑनलाइन' नसल्याने पुरेशा प्रमाणात गॅस उपलब्ध होत नाही. परिणामी वाहनचालकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून अनेक वेळा सीएनजी न मिळाल्याने रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.

जेजुरी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख तीर्थक्षेत्र असून खंडोबाच्या दर्शनासाठी दररोज राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक येथे येतात. याशिवाय जेजुरी परिसरात औद्योगिक वसाहत असल्याने हजारो कामगार, उद्योजक व व्यावसायिकांची ये-जा सुरू असते. पुणे–पंढरपूर महामार्गावरही सातत्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. अशा अत्यंत महत्त्वाच्या मार्गावरील दोन्ही सीएनजी पंप बंद असल्याने खासगी वाहने, टॅक्सी, रिक्षा तसेच प्रवासी व मालवाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.




## सत्ताधाऱ्यांविरोधातील नाराजीमुळे जनतेत बदलाची झुळूक : काकासाहेब चव्हाण

# जनतेतील काका

## काकासाहेब चव्हाण यांची प्रभाग ३३ साठी मजबूत दावेदारी

**(दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 33 मध्ये आगामी महानगरपालिका निवडणुकांचे राजकीय वातावरण तापू लागले असून या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सोपान उर्फ काकासाहेब चव्हाण यांची दावेदारी ठळकपणे पुढे येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे सक्रिय, प्रस्थापित आणि सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून त्यांची ओळख प्रभागातील प्रत्येक वस्तीमध्ये पोहोचलेली आहे.

दैनिक आरंभपर्व मिशन महानगरपालिका सदरामध्ये त्यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी प्रभागातील बदलत्या राजकीय समीकरणांवर आणि जनतेच्या भावना याबाबत सविस्तर माहिती दिली.


काकासाहेब चव्हाण म्हणाले की, "प्रभाग 33 मध्ये सत्ताधाऱ्यांविरोधात प्रचंड नाराजी आहे. नागरिकांनी वर्षानुवर्षे विकासाची वाट पाहिली, पण मूलभूत सुविधांकडे सतत दुर्लक्ष झाले. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता सगळ्या बाबतीत समाविष्ट गावातील सर्व गावे मागे राहिली आहे." त्यानुसार नागरिकांमध्ये बदलाची तीव्र इच्छा निर्माण झाली असून मतदार राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या भूमिकेकडे सकारात्मकतेने पाहत आहेत.

समाविष्ट गावांमध्ये सत्ताधाऱ्यांनी दिलेली आश्वासने कागदावरच राहिली, प्रत्यक्षात कामे झाली नाहीत, त्यामुळे प्रभागभर असंतोष वाढल्याचे चव्हाण यांनी स्पष्टपणे नमूद केले.

"जनतेने विश्वासघात अनुभवला आहे. गावापासून शहराच्या टोकापर्यंत नागरिकांकडून एकच आवाज येतो-'बदल हवा!'" असे म्हणताना त्यांनी आगामी निवडणुकीत प्रभागात मोठे राजकीय चित्र बदलू शकते याचा संकेत दिला.

काकासाहेबांच्या दावेदारीचे प्रमुख बळ म्हणजे त्यांचा जिव्हाळ्याचा जनसंपर्क. प्रभागातील प्रत्येक नागरिकाशी थेट संपर्क, समस्या तातडीने सोडवण्याची कार्यशैली आणि सहज उपलब्धता यामुळे त्यांच्यावर लोकांचा प्रचंड विश्वास आहे. एक प्रस्थापित नेतृत्व म्हणून त्यांची ओळख मजबूत असून महानगरपालिकेत प्रवेशासाठी ते मोठ्या जोमाने प्रयत्न करत आहेत. या प्रयत्नांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

यामुळे ही निवडणूक एकतर्फी नसून अत्यंत चुरशीची होणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.



काकासाहेब चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाबद्दल बोलताना सांगितले-

"राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माननीय शरदचंद्र पवार साहेब आणि खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या दूरदृष्टी व मार्गदर्शनाखाली प्रभाग 33 चा सर्वांगीण विकास करण्याचा आमचा संकल्प आहे. त्यांच्या विकासाभिमुख दृष्टीकोनामुळेच आम्हाला प्रभागासाठी मोठ्या प्रमाणावर काम करण्याची प्रेरणा मिळते."

चव्हाण यांच्या मते प्रभागातील मोठा मतदारवर्ग महाविकास आघाडीच्या बाजूने एकसंध होत आहे. "योग्य रणनीती आखली तर प्रभागातील सर्व जागा राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडी जिंकण्याची पूर्ण शक्यता आहे," असे त्यांनी आत्मविश्वासाने सांगितले.

**स्पष्ट व्हिजन**

- **दर्जेदार पायाभूत सुविधा**
- **शाश्वत पाणीपुरवठा**
- **ड्रेनेज आणि स्वच्छतेची सुधारित व्यवस्था**
- **आरोग्य सुविधा आणि सार्वजनिक सोयी**
- **महिलांसाठी सुरक्षित वातावरण**
- **युवकांसाठी रोजगाराभिमुख उपक्रम**
- **सर्व समाजघटकांना न्याय देणारा विकास**

प्रभाग 33 मध्ये सत्ताविरोधी भावना वाढत असून काकासाहेब चव्हाण यांची सक्रियता, जनसंपर्क आणि विकासाचे स्पष्ट व्हिजन यामुळे त्यांची दावेदारी दिवसेंदिवस अधिक मजबूत होताना दिसत आहे. जनता बदलाची अपेक्षा व्यक्त करत असताना काकासाहेब चव्हाण हे त्या बदलाचे केंद्रबिंदू ठरत आहेत. अशी चर्चाही या प्रभागात होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### धायरीतील संभाजीनगर परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती

पुणे (आरंभ पर्व) : धायरी गावातील बेनकर वस्ती परिसरातील संभाजीनगर भागात रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. यामुळे नागरिकांना, विशेषतः दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पावसाळ्यानंतर रस्त्यांची अवस्था अधिकच खराब झाल्याने अपघाताचा धोका देखील वाढला होता. या गंभीर समस्येची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते श्री. बापूसाहेब बाबासाहेब पोकळे पाटील (सरचिटणीस, ख.वि.म.सं.) आणि सौ. प्रितीताई बापूसाहेब पोकळे पाटील (कार्याध्यक्षा, श्री. संकल्प फाउंडेशन) यांनी पुणे महानगरपालिकेशी सातत्याने पाठपुरावा केला. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन त्यांनी तातडीने रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी केली होती. या पाठपुराव्याला यश येत महानगरपालिकेने संभाजीनगर परिसरातील रस्त्यांच्या डागडुजीचे काम त्वरित हाती घेतले. आधुनिक यंत्रसामग्रीचा (रोलर) वापर करून तसेच दर्जेदार साहित्याच्या सहाय्याने रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात आले. त्यामुळे परिसरातील वाहतूक आता अधिक सुरळीत व सुरक्षित झाली आहे. रस्त्यांचे काम पूर्ण झाल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, संबंधित पदाधिकारी व संकल्प फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले आहे. "वेळेवर समस्या सोडवल्यामुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला आहे," अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. जनतेच्या दैनंदिन समस्यांबाबत संकल्प फाउंडेशन आणि संबंधित पदाधिकारी भविष्यातही तत्परतेने कार्य करतील, असे बापूसाहेब पोकळे यांनी सांगितले.

### तलाठी संघाचा ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार

सिंहगड-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : राज्यातील सर्व शेतकरी खातेदार बांधवांना कळविण्यात येते की, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांना ऑनलाईन कामकाजासाठी देण्यात आलेले लॅपटॉप तसेच प्रिंटर-कम-स्कॅनर ही उपकरणे पूर्णतः जीर्ण व निकामी झालेली आहेत. त्यामुळे दैनंदिन ऑनलाईन सेवा देताना मोठ्या अडचणी येत आहेत. ही उपकरणे तातडीने बदलून नवीन व उच्च क्षमतेची लॅपटॉप व प्रिंटर-कम-स्कॅनर उपलब्ध करून द्यावीत, यासाठी महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्या वतीने शासनाकडे अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला. मात्र, आजपर्यंत केवळ आश्वासनांखेरीज ठोस निर्णय झालेला नाही. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळाधिकारी यांनी आज दिनांक १५/१२/२०२५ पासून ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. या बहिष्कारामुळे ७/१२ व ८अ उतारे वितरण, ई-पीक पाहणी नोंदणी, ई-फेरफार प्रक्रिया, तसेच ऑनलाईन वाहन तपासणी, शेतकरी ओळखपत्र मंजुरी यांसारख्या महत्त्वाच्या ऑनलाईन सेवांवर परिणाम होणार आहे.







# प्रभाग क्रमांक ३४ च्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध

## जयश्रीताई बाबासाहेब पोकळे

## सर्वसामान्य जनतेचा विकास व्हावा हीच माझी अपेक्षा – पोकळे






(दै. आरंभ पर्व)

पुणे महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 34 मधून भारतीय जनता पार्टीकडून इच्छुक असलेल्या जयश्रीताई बाबासाहेब पोकळे यांनी विकासाला प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.दैनिक आरंभपर्वच्या मिशन महानगरपालिका या सदरामध्ये त्यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी आपली भूमिका स्पष्ट शब्दांत मांडली. जयश्रीताई पोकळे म्हणाल्या की, भारतीय जनता पार्टीचे लोकप्रिय आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक 34 चा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. विकासकामांमध्ये सातत्य, पारदर्शकता आणि नागरिकांचा सहभाग हेच माझ्या कामाचे प्रमुख सूत्र राहील.

आपल्या आतापर्यंतच्या कार्याचा आढावा देताना त्या म्हणाल्या की, जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम करत असताना गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. अनेक वाडी-वस्ती भागांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. कोरोनाच्या कठीण काळात गरीब व गरजू कुटुंबांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले, तसेच सुमारे १५ हजार नागरिकांचे लसीकरण यशस्वीपणे करण्यात आले. याशिवाय श्रमकार्ड योजना, विविध शासकीय योजनांचा लाभ अनेक नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आला. ग्रामीण भागातील ५०० गरजू महिलांना गॅस सिलेंडरचे वाटप करण्यात आले. कोरोनाच्या काळात आर्थिक अडचणीत सापडलेल्या नागरिकांचे दवाखाना बिल माफ करून देण्यासाठी संबंधित विभागांकडे पाठपुरावा करत एक ते दीड लाख रुपयांपर्यंतची बिले माफ करून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

नऱ्हे रानवडे माहेर व धायरीतील पोकळे सासर तर इतरही नातेगोते भरपूर आहेत त्यामुळे त्यांनाही फायदा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

"मला आजवर जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली, अनेकांच्या अडचणी सोडवता आल्या. पुढेही अशीच संधी मिळावी, हीच माझी अपेक्षा आहे," असे भावनिक शब्दांत जयश्रीताई पोकळे यांनी सांगितले.दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य आणि एक वेळा धायरी गावच्या सरपंच म्हणून मिळालेला अनुभव हा महापालिकेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे वापरण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि महिलांसाठी विशेष योजना यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेवटी पक्ष नेतृत्वाकडे अपेक्षा व्यक्त करताना जयश्रीताई पोकळे म्हणाल्या की, पक्षाने संधी दिल्यास प्रभाग क्रमांक 34 ला आदर्श प्रभाग बनवण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करेन. सगळ्यांचा विकास व्हावा, हीच माझी खरी भूमिका आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन विस्तारीकरण जागेच्या लढ्याला यश



पुणे (दै. आरंभ पर्व)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, विस्तारीकरण जागेच्या लढ्याला आज यश आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन विस्तारीकरण समिती, पुणे शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांच्या व्यस्त दौऱ्यात सुध्दा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व भाजप शहरअध्यक्ष धिरज घाटे यांनी गणेश कला क्रिडा मंच येथे शिष्टमंडळाची भेट घडवून दिली. या भेटीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन विस्तारीकरणाच्या ज्या जागेसाठी समस्त आंबेडकरी जनता लढा देत होते त्याकरिता मुख्यमंत्री फडणवीस यांनी देखील शिष्ट मंडळाला अश्वासित केले की, सदरची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन विस्तारीकरणासाठी देण्यात येईल व त्याप्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमांमध्ये तशी घोषणा देखील केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी संजय सोनवणे, बाळासाहेब जानराव, परशुराम वाडेकर, आसित गांगुर्डे, शैलेंद्र चव्हाण, अशोक कांबळे, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन विस्तारीकरण समिती, पुणे यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## भाजपाची उमेदवारी : प्रस्थापितांना संधी की तरुणांना?

### सर्वांचे लक्ष केंद्रित : अनेक प्रभागात उमेदवारीसाठी रस्सीखेच झाल्याने सर्वत्र उत्सुकता!!



पुणे-लक्ष्मण साबळे
(दै. आरंभ पर्व)

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने जोरदार तयारी सुरू केली आहे. इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या असून उमेदवारी अर्जही स्वीकारण्यात आले आहेत. मात्र यंदा भाजपाचे नेमके उमेदवारी धोरण काय असणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

यावेळी प्रस्थापित, अनुभवी नेत्यांना पुन्हा संधी दिली जाणार की नव्या व तरुण चेहऱ्यांवर पक्ष विश्वास टाकणार, हा कळीचा प्रश्न ठरला आहे. काही प्रभागांमध्ये विद्यमान नगरसेवकांची तिकिटे कापली जाण्याची शक्यता वर्तवली जात असून त्यामुळे अस्वस्थता वाढताना दिसत आहे. तर दुसरीकडे, नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार या चर्चेमुळे तरुण कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

पक्षाच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उमेदवार निवडताना केवळ लोकप्रियता नव्हे तर संघटनात्मक काम, जनसंपर्क, विजयाची क्षमता तसेच आर्थिक बाबींचाही विचार केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुणे महानगरपालिकेत एकहाती सत्ता मिळवण्याचे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून, पक्षाच्या धोरणात बसणाऱ्या उमेदवारांनाच संधी दिली जाईल, असे संकेत मिळत आहेत.

नाराजी आणि बंडखोरी टाळण्यासाठी अनेक प्रभागांमध्ये अगदी शेवटच्या क्षणी उमेदवारी जाहीर केली जाऊ शकते, अशी चर्चा आहे. काही ठिकाणी संभाव्य बंडखोरी रोखण्यासाठी पक्ष वेगवेगळ्या पर्यायांचा विचार करत असल्याचेही बोलले जात आहे.

दरम्यान, इतर पक्षातील इच्छुक नेत्यांना सध्या 'वेटिंग'वर ठेवण्यात आले असले तरी योग्य वेळ साधून प्रवेश देऊन त्यांना उमेदवारी दिली जाऊ शकते, अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपाचे काही इच्छुक इतर पक्षांच्या संपर्कात असल्याच्या चर्चाही जोर धरत आहेत.

एकूणच, भाजपाची उमेदवारी यादी कशी असेल, प्रस्थापितांना किती संधी मिळते आणि तरुणांना किती पुढे आणले जाते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.


## 'नऱ्हे पोलिस स्टेशन'चे दिमाखदार उद्घाटन



पुणे (दै. आरंभ पर्व)

सिंहगड रस्त्यावरील नऱ्हे पोलिस स्टेशनचे अधिकृत उद्घाटन सोमवारी (ता. १५) दुपारी १.३० वाजता उत्साहात पार पडले. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानंतर सिंहगड पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप दाइंगडे यांच्या हस्ते या नव्या पोलिस ठाण्याचे उद्घाटन करण्यात आले. नऱ्हे परिसरातील वाढती लोकसंख्या, झपाट्याने होत असलेले नागरीकरण आणि कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने स्वतंत्र पोलिस ठाण्याची गरज लक्षात घेऊन नऱ्हे पोलिस स्टेशनची स्थापना करण्यात आली आहे. उद्घाटन सोहळ्याला नऱ्हे पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक आसाराम शेटे, पोलिस निरीक्षक उल्हास कदम, सहाय्यक पोलिस निरीक्षक समीर चव्हाण यांच्यासह अन्य पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटनानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप दाइंगडे यांनी नऱ्हे पोलिस स्टेशनचा कार्यभार अधिकृतरित्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक आसाराम शेटे यांच्याकडे सुपूर्द केला. नऱ्हे पोलिस स्टेशनसाठी एकूण १६४ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये ४ पोलिस निरीक्षक, ६ सहाय्यक पोलिस निरीक्षक, १३ पोलिस उपनिरीक्षक, १३ सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक, ४४ पोलिस हवालदार आणि ८४ पोलिस शिपाई यांचा समावेश आहे. यासंदर्भातील मंजुरीचे परिपत्रक रविवारी (ता. १४ डिसेंबर) गृह विभागाचे उपसचिव यांनी निर्गमित केले होते. सध्या या पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात नऱ्हे पोलिस चौकीची पूर्वीचीच हद्द कायम ठेवण्यात आली असून, मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील कात्रज नवीन बोगद्यापासून मुठा नदीपर्यंतचा परिसर नऱ्हे पोलिस स्टेशनच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आला आहे. नवीन पोलिस स्टेशन कार्यान्वित झाल्यामुळे परिसरातील गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण, नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण आणि पोलिस-नागरिक समन्वय अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## जानेवारीपासून बिग बॉस मराठी



पुणे (दै. आरंभ पर्व)

"स्वागताला दारं उघडी ठेवा! मी येतोय," म्हणत रितेश देशमुख घेऊन येत आहे बिग बॉस मराठी सिझन ६. नव्या प्रोमोमुळे महाराष्ट्रात एकच चर्चा, एकच विषय घोळतोय बिग बॉस मराठी सिझन ६. सगळीकडे उत्साहाची लाट उसळली आहे. रितेश भाऊंचा मस्त लूक, दमदार स्वॅग प्रेक्षकांची मने जिंकत आहे. "मागचा सिझन वाजवलाय, यंदाचा गाजवायचाय...आहात ना तय्यार!" भाऊच्या या वाक्याने प्रेक्षकांची धडधड अजूनच वाढली आहे. नव्या सिझनची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. मागील सिझनने जबरदस्त धुमशान घातलं आणि यंदाच्या सिझनमध्ये Swag तोच असणार आहे, पण पॅटर्न रितेश भाऊंचा असणार आहे. काय पॅटर्न असणार? कसा लूक असणार? सदस्य कोण असणार? सगळं अजून गुलदस्त्यात आहे. बिग बॉस मराठी सिझन ६ - ११ जानेवारीपासून दररोज रात्री ८ वा. कलर्स मराठी आणि JioHotstar वर! भाऊच्या एंट्रीसाठी उभारलेला आलिशान सेट, भव्य मिरवणुकीचे वातावरण, ढोल–ताशांचा गजर, रंगीबेरंगी रोषणाई आणि तब्बल २५० ते ३०० लोकांची दणदणीत उपस्थिती या सगळ्यांच्या साक्षीने पार पडला बिग बॉस मराठीच्या नव्या सिझनचा लार्जर-दॅन-लाईफ प्रोमो. रितेश भाऊने पहिल्यांदाच प्रोमोमध्ये पारंपरिक वेशभूषा केली आहे.

## डिकाईतर्फे भव्य दिव्यांग चित्रकला स्पर्धा उत्साहात संपन्न



पुणे (दै. आरंभ पर्व)

दिव्यांग इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (डिकाई) यांच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली भव्य चित्रकला स्पर्धा रमणबाग न्यू इंग्लिश स्कूल, पुणे येथे अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडली. या स्पर्धेत विविध वयोगटांतील ६०० पेक्षा अधिक दिव्यांग विद्यार्थी तसेच त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


स्पर्धेदरम्यान दिव्यांग विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून, रंगसंगतीतून आणि चित्रकलेतील कौशल्यातून निसर्ग, सामाजिक विषय, स्वप्ने आणि आत्मविश्वास यांचे प्रभावी चित्रण केले. त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, आत्मविश्वास वृद्धिंगत व्हावा आणि सर्जनशीलतेला चालना मिळावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास महाराष्ट्र सायबर विभाग, मुंबई येथील पोलीस उपमहानिरीक्षक (IPS) संजय शिंत्रे, ज्येष्ठ चित्रकार व शिल्पकार प्रमोद कांबळे, डिकाई संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ध्यानगुरु रघुनाथ येमुल गुरुजी, रमणबाग न्यू इंग्लिश स्कूलचे उपमुख्याध्यापक जयंत टोले, डिकाई संस्थेचे सचिव शेखर यादव तसेच समन्वयक प्रशांत मोहोळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### सौ. मोनिका नवनाथ नढे आयोजित न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमाला प्रभाग क्रमांक २२ मधील

# महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

- सौ. मोनिका नवनाथ नढे हे प्रभागाचे नेतृत्व करणार नागरिकांचा निर्धार



काळेवाडी (दै. आरंभ पर्व)

प्रभाग क्रमांक २२ मध्ये जिजाऊ महिला प्रतिष्ठान व नवनाथ दादा नढे पाटील सोशल फाउंडेशन आयोजित न्यू होम मिनिस्टर खेळ रंगला पैठणीचा हा कार्यक्रम नढे नगर, विजयनगर, पवनानगर, आदर्श नगर, काळेवाडी मधील खास लाडक्या बहिणीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमाला प्रभागातील शेकडोच्या संख्येने महिलांनी सहभागी होऊन खेळ ,गप्पा, गोष्टी,मनोरंजन, प्रश्नमंजुषा व विविध स्पर्धेत सहभाग घेऊन अनेक प्रकारचे आकर्षक बक्षीस व पैठणी जिंकली.

न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमांमध्ये सहभागी प्रथम क्रमांक ई बाईक व मानाची पैठणी द्वितीय क्रमांक फ्रिज तृतीय क्रमांक ४३ इंची एलईडी टीव्ही, चतुर्थ क्रमांक वाशिंग मशीन, पाचवा क्रमांक मिक्सर व लकी ड्रॉ विजेत्यास सोन्याची नथ बक्षीस व मानाची पैठणी जिंकणारा विजेता मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष योगेश बहल , पिंपरी चिंचवड महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, विरोधी पक्षनेते नाना काटे, मा. नगरसेवक विनोद नढे, संतोष कोकणे या प्रमुख मान्यवरांनी प्रभाग क्रमांक २२ मधून येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये इच्छुक उमेदवार सौ.मोनिका नवनाथ नढे यांना मोठ्या प्रमाणात मतदान करून त्यांना विजयी करावे व प्रभागातील नागरिकांची सेवा करण्याची संधी द्यावी, सर्व सामान्य नागरिकांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, आणि प्रभागातील महिलांसाठी खास आयोजित केलेल्या न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमांमध्ये महिलांच चांगला प्रतिसाद पाहून सौ मोनिका नवनाथ नढे यांचे कौतुक केले व त्यांना पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी मोनिका नढे म्हणाले की, प्रभागातील सर्व सामान्य नागरिकांचे अनेक प्रश्न आहेत, त्यांना येणाऱ्या अडीअडचणी, समस्या जाणून घेऊन मार्गी लावणे, समाजात सध्या सुरू असलेल्या स्त्री अत्याचारावर आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे. यावेळी सर्व महिलांनी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सर्व महिलांची प्रश्न सोडवण्यासाठी , प्रभागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी , त्यांच्या सुरक्षिततेसाठी व सामाजिक, राजकीय धार्मिक आरोग्य शैक्षणिक सेवेच्या माध्यमातून मी अनेक कामे करण्याचा संकल्प केला असे बोलून त्यांनी कार्यक्रम मध्ये विजयी झालेल्या महिलांना शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या महिलांचे मनापासून आभार व्यक्त केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे




### जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने सर्व-नवीन हेक्टर केली लाँच

पुणे (आरंभ पर्व) : JSW MG मोटर इंडियाने आज ऑल-न्यू MG हेक्टरच्या लॉन्चची घोषणा केली, जी एसयूव्ही सेगमेंटमध्ये ठळक डिझाइन, अतुलनीय आराम, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि डायनॅमिक ड्रायव्हिंग अनुभवाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ऑल-न्यू हेक्टरमध्ये नवीन पुढील आणि मागील बंपर डिझाइन, सर्व-नवीन ग्रिल डिझाइन, नवीन अलॉय व्हील्ससह एक आकर्षक बाह्यरूप आहे आणि दोन नवीन रंग - सेलाडॉन ब्लू आणि पर्ल व्हाइटमध्ये उपलब्ध आहे. इंटिरियर्समध्ये ५-सीटर ट्रिमसाठी ड्युअल टोन आइस ग्रे थीम आणि ६ आणि ७-सीटर ट्रिमसाठी ड्युअल टोन अर्बन टॅन थीम आहे, ज्यामुळे केबिनला अधिक प्रीमियम आणि आकर्षक स्वरूप मिळते. ऑल-न्यू MG हेक्टर रेंजची सुरुवातीची किंमत INR 11.99 लाख (एक्स-शोरूम) सुरू (केवळ मर्यादित युनिट्ससाठी) आहे.



### इनव्हेलियर इंडिया व राष्ट्रवादी कामगार युनियनमध्ये वेतन करार

पुणे (आरंभ पर्व) : रांजणगाव येथील इनव्हेलियर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि राष्ट्रवादी कामगार युनियन यांच्यात सन 2025–26 या कालावधीसाठीचा वेतन करार यशस्वीपणे संपन्न झाला. कामगारांच्या हिताचा विचार करून झालेल्या सविस्तर चर्चेनंतर चार वर्षांसाठी एकूण 21,500 रुपयांची वेतनवाढ मंजूर करण्यात आली असून 88,000 रुपये वेतन फरक देण्यास व्यवस्थापनाने सहमती दर्शवली. कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्य सुरक्षेसाठी तीन लाख रुपयांपर्यंतचा मेडिक्लेम लाभही कंपनीने मान्य केला. हा करार खेळीमेळीच्या वातावरणात अंतिम करण्यात आला. वेतनवाढ टप्प्याटप्प्याने लागू राहणार असून पहिल्या वर्षी 50 टक्के, दुसऱ्या वर्षी 25 टक्के, तिसऱ्या वर्षी 15 टक्के आणि चौथ्या वर्षी 10 टक्के अशी अंमलबजावणी होणार आहे. हा वेतन करार पुण्यातील खराडी येथील हॉटेल रेडिसन ब्लू येथे संपन्न झाला.




### संत निरंकारी मिशनद्वारा सांगवी येथे रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

सांगवी (आरंभ पर्व) : आध्यात्मिकताच मानवी एकता मजबूत करू शकते आणि माणसांना एकमेकांच्या जवळ आणून परस्पर प्रेम आणि सौहार्दाचे वातावरण निर्माण करू शकते. त्याच हेतूने सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज एवं निरंकारी राजपिता जी यांच्या आशीर्वादाने पुणे झोन मधील सांगवी येथे संत निरंकारी मिशन ची सामाजिक शाखा, संत निरंकारी चेरिटेबल फाउंडेशनद्वारा विशाल रक्तदान शिबिराचे आयोजन रविवार, १४ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. ज्यामध्ये मिशनचे अनुयायी आणि आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन १५० युनिट रक्त संकलन करण्यात आले. वाय. सी. एम. रुग्णालय रक्तपेढी यांनी १५० युनिट रक्त संकलन करून विशेष योगदान दिले. या शिबिराचे उद्घाटन श्री गिरीधारीलाल मतनानी (संयोजक पिंपरी) यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

### थंडीचा वाढता जोर, तर निवडणुकीत उमेदवारांची धावपळ आणि कसरत

सिंहगड – खडकवासला-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील खडकवासला परिसरात डिसेंबर महिन्यात थंडीचा पारा घसरत असतानाच महानगरपालिकेच्या निवडणुकीचे वातावरण मात्र चांगलेच तापले आहे. गुलाबी थंडीचा अनुभव घेत असतानाच उमेदवारांसाठी ही थंडी जणू कसोटीची ठरत आहे. एकीकडे थंडीचा वाढता जोर तर दुसरीकडे प्रचारासाठी उमेदवारांची धावपळ, मतदारांच्या भेटीगाठी आणि दिवसरात्र सुरू असलेले प्रयत्न पाहायला मिळत आहेत. विविध प्रभागांमध्ये कॉर्नर सभा, पक्ष नेत्यांची भाषणे, कार्यकर्त्यांचा जोमदार प्रचार आणि मतदारांची वाढती जागरूकता यामुळे निवडणुकीचे वातावरण अधिकच चुरशीचे बनले आहे. जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करताना उमेदवार नाराज गटांशी संवाद साधत आहेत. त्यांच्या तक्रारी ऐकून नाराजी दूर करण्यावर भर दिला जात असून, त्यांना प्रचारात सक्रिय करण्याचे प्रयत्न अनेक उमेदवारांना यशस्वी ठरत आहेत. विशेष म्हणजे, ऐन थंडीच्या रात्री महिलांसह नागरिकांना कॉर्नर सभांसाठी एकत्र आणणे आणि तब्बल दोन तास भाषणे ऐकवणे ही उमेदवारांसाठी मोठी कसरत ठरत आहे. तरीही प्रचाराचा उत्साह कुठेही कमी झालेला दिसत नाही. निवडणुकीच्या या धामधुमीत पक्षांचे उमेदवार थेट मतदारांच्या दारात पोहोचत असून, स्थानिक समस्यांवर चर्चा करत विविध योजनांची आश्वासने देत आहेत. थंडीच्या वातावरणातही मतदारांचा उत्साह कायम असून, मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नागरिक सज्ज झाले आहेत. यंदाची निवडणूक थंडीत होत असली तरी या गुलाबी थंडीत कोण यशाची बाजी मारणार, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे.







# मनसेकडून उमेदवारीसाठी ३ इच्छुकांचे अर्ज, निवडणुकीची तयारी जोरात

## मनसेचा बालेकिल्ला पुन्हा परत मिळवण्याचा निर्धार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेना संघटनात्मक तयारीला वेग देत आहे. शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे शहरातील सर्व प्रभागांमध्ये उमेदवार निवड प्रक्रियेची हालचाल सुरू झाली असून, प्रभाग क्रमांक 33 मध्ये मनसेचे वलय पाहता मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. याशिवाय याच प्रभागातून विजयमामा इंगळे, शितलताई इंगळे यांनीही पक्षाकडे उमेदवारी मागितली आहे.

प्रभाग 33 मध्ये मनसेचा मतदारसंघ मजबूत असून, याठिकाणी यापूर्वी मनसेने आमदारदेखील निवडून दिला आहे. त्यामुळे या प्रभागात मनसेचे प्रभावी अस्तित्व आजही टिकून असल्याचे चित्र आहे. याच पार्श्वभूमीवर प्रभाग 33 मधून मनसे वाहतूक सेनेचे शिवाजीराव मते, रमेशअण्णा करंजावणे आणि रणरागिणी सेनेच्या सक्रिय नेत्या सोनालीताई पोकळे यांनी पक्षाकडे अधिकृतपणे उमेदवारीची मागणी केली आहे.

मनसेचा बालेकिल्ला पुन्हा मिळवून आणण्याचा आम्ही निर्धार केला असल्याचे शिवाजीराव मते यांनी सांगितले.

रमेशअण्णा करंजावणे यांनी प्रभाग क्रमांक 33 मध्ये मनसेचे रेल्वे इंजिन पुन्हा सुसाट वेगाने धावेल असा विश्वास व्यक्त केला..

सोनाली ताई पोकळे यांनी मनसेच्या माध्यमातून प्रभागाचे विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले आहे. तिघा इच्छुकांनी आपापले उमेदवारी अर्ज शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांच्या संपर्क कार्यालयात जमा केले.




पक्षाने दिलेल्या आदेशानुसार आणि धोरणाप्रमाणे काम करण्याची तयारी तिघांनीही दाखवली असून, प्रभाग 33 मध्ये विजय मिळवण्याचा ठाम आत्मविश्वास व्यक्त केला आहे.

मनसेच्या वाढत्या संघटनशक्तीचा आणि मतदारसंघातील भक्कम आधाराचा फायदा या निवडणुकीत उमेदवारांना नक्कीच होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. येत्या काही दिवसांत पक्षाकडून योग्य ती छाननी करून अधिकृत उमेदवार जाहीर होण्याची शक्यता आहे.

### तिसरी राष्ट्रीय बौद्धिक संपदा यात्रा १९, २० डिसेंबरला पुण्यात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय (एमएसएमई) आणि एआयसी पिनॅकल आंत्रप्रेन्युअरशीप फोरम यांच्यातर्फे दोन दिवसीय तिसऱ्या राष्ट्रीय बौद्धिक संपदा (इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी-आयपी राईट्स) यात्रेचे आयोजन १९ व २० डिसेंबर २०२५ रोजी हॉटेल लेमन ट्री प्रीमिअर, पुणे येथे करण्यात आल्याची माहिती 'एआयसी पिनॅकल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील धाडीवाल यांनी दिली आहे. 'विकसित भारत @२०४७ साठी बौद्धिक संपदा-आधारित अर्थव्यवस्था उभारणी' अशी या आयपी यात्रेचे मध्यवर्ती संकल्पना आहे. भारत सरकारने बौद्धिक संपदा कायद्याबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. यामध्ये पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराईट, डिझाईन आणि जीआय आदी बौद्धिक संपदेच्या हक्कांबाबत जागृती, सर्जनशील उपक्रमांना प्रोत्साहन, कल्पना आणि इनोव्हेशनचे संरक्षण, प्रगत तंत्रज्ञान अंतर्भूत करून एमएसएमई सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या बौद्धिक संपदेची नोंद करण्यास सहकार्य करण्याचे ध्येय या उपक्रमाचे आहे. एमएसएमईना देशभरातील आयपी फॅसिलिटेशन सेंटरशी जोडण्याचे काम होत असून, इनोव्हेटर्सना क्रिएटिव्ह कामाचे प्रदर्शन करण्यास प्रोत्साहन, मार्गदर्शन, निधी आणि सहाय्य पुरवले जात आहे. इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी फॅसिलिटेशन सेंटरमार्फत (आयपीएफसी) मोफत आयपी सेवा पुरवल्या जात असून, एआयसी पिनॅकल हे अधिकृत 'आयपीएफसी' केंद्र आहे.

### रस्ता रुंदीकरणाच्या कामाचा नागरिकांच्या हस्ते शुभारंभ





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वारजे परिसरातील चर्च ते माई मंगेशकर हॉस्पिटल दरम्यान पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या १८ फूट रस्ता रुंदीकरणाच्या कामाचा शुभारंभ आज पार पडला. वारजे माळवाडी परिसरातील विविध सोसायट्यांचे प्रमुख व नागरिकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

या रस्त्याचे रुंदीकरण व्हावे, यासाठी माजी नगरसेवक सचिन दोडके यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. परिसरातील वाढती वाहतूक, अरुंद रस्ता आणि त्यामुळे होणारी कोंडी लक्षात घेऊन हा विषय त्यांनी वेळोवेळी पुणे महानगरपालिका प्रशासनाकडे मांडला होता. त्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाल्याने आज प्रत्यक्ष कामाचा शुभारंभ झाला.

या रस्त्यामुळे चर्च ते माई मंगेशकर हॉस्पिटलदरम्यानची वाहतूक अधिक सुरळीत होणार असून नागरिकांचा दैनंदिन प्रवास सुलभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः रुग्णवाहिका, शालेय वाहने व स्थानिक रहिवाशांसाठी हा रस्ता उपयुक्त ठरणार आहे. शुभारंभ प्रसंगी माजी नगरसेवक सचिन दोडके, युवा नेते बाबुशेठ दोडके, रोहनअण्णा धावडे यांच्यासह नागरिक वारजे भागातील विविध सोसायटीमधील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना सचिन दोडके यांनी सांगितले की, या रस्त्याच्या शुभारंभामुळे परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागणीला प्रतिसाद मिळाला आहे. पुढील काळातही परिसरातील मूलभूत प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असे त्यांनी सांगितले.

एकूणच, वारजे परिसराच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या रस्ता रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात झाली असून, त्यामधून नागरिकांना सुलभ प्रवास करता येईल अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# नवले पुल : वृक्षारोपण व मोफत हेल्मेट वाटप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवले पुलावर झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षण आणि वाहतूक सुरक्षेचा संदेश देणारा सामाजिक उपक्रम रविवारी पुण्यात राबविण्यात आला. 'झाडे लावा, झाडे जगवा' फाऊंडेशन, व्यंकटसाई होंडा सेल्स अँड सर्व्हिस तसेच पत्रकार विठ्ठल तांबे आणि मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.



सातारा टोल रोडच्या वतीने 'झाडे लावा, झाडे जगवा' या संकल्पनेअंतर्गत रविवारी (दि. 14 डिसेंबर 2025) सकाळी 10.30 वाजता आशीर्वाद हॉटेलजवळील सर्व्हिस रोडवरील सेल्फी पॉइंट परिसरात वृक्षारोपण व मोफत हेल्मेट वाटप कार्यक्रम पार पडला. या वेळी रस्त्याच्या कडेला विविध देशी वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यासोबतच दुचाकी चालकांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. वाहतूक सुरक्षेबाबत जनजागृती करणे, नियमांचे पालन करण्याचे आवाहन करणे आणि अपघातांचे प्रमाण कमी करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते सुरेश भाले, राजेश बोबडे, कैलास गुरव, योगेश टेकवडे, गोपीनाथ गुजर, रोहिदास जोरी, संतोष कदम (व्यंकटसाई होंडा), तानाजी कांबळे,जय पिल्लाई, सुनील पिल्लाई, मोहित भगतकर, माणिक दिवटे, विजय शिळीमकर, सोपान हेगडे, दत्तात्रय मुळूक, 'झाडे लावा, झाडे जगवा' फाऊंडेशनचे सदस्य तसेच महामार्ग गस्त पथकातील कर्मचारी उपस्थित होते. प्रकल्प संचालक संजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अभिजीत गायकवाड, अमोल भोरे, सम्राट शिंदे, वैभव पाटील, गुणीलाल ठाकूर आणि सुरेंद्र कुमार यांनी उपक्रमात सहभाग घेतला.

नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सामाजिक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### तज्ञांमार्फत नवले ब्रिजचे ऑडिट व्हावे : तानाजी कांबळे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दोन वर्षांपूर्वी अशाच प्रकारचा अपघात मी स्वतःचा जीव धोक्यात घालून वेळीच रोखला नाहीतर पुढे असाच झालेला प्रकारचा अनर्थ झाला असता त्याचे गांभीर्य त्यावेळेस कोणी प्रशासनाने व इतरांनी घेतली नाही त्यानंतर अनेक वेळा अपघात झाले व परवा झालेला हा भीषण अपघात महाभयंकर असा होता निष्पापंचा बळी गेला त्या चिमुकल्यांचा छत्र हरपले त्यांच्या भविष्याचा काय त्यांना भरघोस रोख मदत करून त्यांच्या शिक्षणाचा खर्च प्रशासनाने उचलावा इथून पुढे होणारे अनर्थ टाळायचे असतील तर




रस्ते विकास महामंडळाच्या तांत्रिक समितीकडून सर्व नवले परिसराचा सर्वेक्षण, सेफ्टी ऑडिट करून प्रदीर्घ अशी उपाययोजना करण्यात यावी यापुढे होणाऱ्या अपघात व निष्पापांचे जाणारे बळी रोखण्यात यावेत अत्यंत तातडीची उपाययोजना म्हणून शासनाने याला मंजुरी देऊन तत्काळ उपयोजनांच्या कामाला सुरुवात करावी एवढीच इच्छा.

### हिमालय बेबीकेअरचा 'लव्ह्ड बाय बेबीज' कॅम्पेन

## आई–डॉक्टरांच्या विश्वासाला सलाम

**राष्ट्रीय (दै. आरंभ पर्व)**

हिमालय बेबीकेअरने 'लव्ह्ड बाय बेबीज' ही आपली ओळख अधोरेखित करणारी हृदयस्पर्शी आणि खेळकर मोहीम सुरू केली आहे. "प्रिस्क्राईब बाय डॉक्टर्स, ट्रस्टेड बाय मॉम्स अँड लव्ह्ड बाय बेबीज" या संकल्पनेतून बाळांचे प्रेम, आईंचा विश्वास आणि डॉक्टरांची शिफारस हेच ब्रँडचे खरे बळ असल्याचा संदेश देण्यात आला आहे.




या मोहिमेत बाळांनाच कथानकाच्या केंद्रस्थानी ठेवत, एका काल्पनिक पत्रकार परिषदेत बाळे आपले आवडते 'इन्फ्लुएंसर' म्हणून 'आई' आणि 'डॉक्टर' यांची निवड करतात. विनोदी आणि भावनिक शैलीत सादर केलेल्या या कॅम्पेनमध्ये एआय तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'बोलणारी बाळे' दाखवण्यात आली आहेत. हिमालय वेलनेस कंपनीचे बिझनेस डायरेक्टर राजेश कृष्णमूर्ती यांनी सांगितले की, बाळांचे आरोग्य आणि सुरक्षितता हेच हिमालय बेबीकेअरचे मुख्य उद्दिष्ट असून, निसर्गातील घटक आणि आधुनिक विज्ञानाच्या आधारे सुरक्षित उत्पादने देण्याची बांधिलकी कंपनी कायम जपते. ही मोहीम मराठीसह आठ भाषांमध्ये डिजिटल आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सुरू करण्यात आली आहे.

# ४० वर्षांची रस्त्याची समस्या सुटली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

किरकटवाडी परिसरातील अंतर्गत रस्त्याची गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली समस्या अखेर मार्गी लागली आहे. परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या दैनंदिन अडचणी लक्षात घेऊन प्रदेश भाजप ओबीसी मोर्चाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे व खडकवासला भाजपच्या सरचिटणीस धनश्रीताई कोल्हे यांनी स्वखर्चातून सिमेंट कॉंक्रीट रस्ता करून दिला असून, या रस्त्याचे लोकार्पण उत्साहात पार पडले.

या सोसायटी अंतर्गत रस्त्यावर पावसाळ्यात चिखल, तर उन्हाळ्यात प्रचंड धुळीमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते ही समस्या तब्बल ४० वर्षांपासून कायम होती. अनेकदा प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. अशा परिस्थितीत कोल्हे दाम्पत्याकडे या समस्येबाबत नागरिकांनी कळवले.



## कोल्हे दाम्पत्याच्या स्वखर्चातून सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे लोकार्पण

त्यांनी पुढाकार घेत ही समस्या कायमस्वरूपी सोडवली. व स्वखर्चातून या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करून दिले. नव्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्यामुळे नागरिकांची ये-जा सुलभ झाली असून परिसरातील स्वच्छता आणि सुरक्षिततेतही सुधारणा झाली आहे. विकास कामासाठी कोणताही गाजावाजा न करता प्रत्यक्ष कृतीतून समस्या सोडवण्याची भूमिका कोल्हे दाम्पत्याने घेतल्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. लोकार्पणाच्या वेळी उपस्थित रहिवाशांनी "आमची ४० वर्षांची समस्या सुटली, हा आमच्यासाठी आनंदाचा क्षण आहे," अशा भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित रहिवाशांनी दत्ताभाऊ कोल्हे व धनश्रीताई कोल्हे यांचा सत्कार करून त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. तसेच आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी त्यांना जाहीर पाठिंबा देत त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.

यावेळी कार्यक्रमास प्रदेश भाजप ओबीसी मोर्चाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे, खडकवासला भाजप सरचिटणीस धनश्रीताई कोल्हे यांच्यासह सीताराम कोलटकर, ॲड. श्रीनाथ राऊत, कृष्णाजी राऊत, बाळासाहेब निगडे, कैलास निगडे, पोपट निगडे, गजानन तनपुरे, गौरी कोलटकर, अनुराधा राऊत, कविता तनपुरे, सुप्रिया राऊत, सुलभा कोलटकर आदी मान्यवर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.